# पुणे विद्यापीठ

ध्वनी क्रमांक २५६०११५४,
२५६०११६०,
६५००३७००
६५००३७०१

टेलिग्राम 'युनिपुना'
टेलेक्स: १४५७७१९ युनिप इन्
फॅक्स : ०२०– २५६०११५४

गणेशखिंड, पुणे ४११००७

संदर्भ क्र. सभाअ/३९९ दिनांक : २२/०८/२०१२

**प्रति**

**मा.प्राचार्य/संचालक**

**पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था**

**(पुणे शहर व ग्रामीण विभाग)**

**'कन्यारत्न' ....अभियानांतर्गत**

**<u>पुणे विद्यापीठ आयोजित भव्य रॅलीमध्ये स्वयंसेवक सहभागाबाबत...</u>**

**महोदय,**

मा. कुलगुरु डॉ. वासुदेव गाडे यांचे संकल्पनेतून पुणे विद्यापीठअंतर्गत स्त्रीभ्रुण हत्या रोखणेकरीता **'कन्यारत्न अभियान'** सुरु करण्यात आलेले आहे. या अभियानांतर्गत पुणे विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालय व संस्थांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या मार्फत समाजामध्ये स्त्रीभ्रुण हत्या रोखण्याकरीता भव्य रॅली, पोस्टर प्रदर्शन व घोषवाक्य स्पर्धा, एकपात्री प्रयोग, वत्कृत्व व निबंध स्पर्धा, प्रबोधनपर व्याख्याने, पथनाटय स्पर्धा अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात येणार आहे.

या अभियानाची प्रातिनिधिक सुरूवात पुणे विद्यापीठामार्फत करण्यात आलेली असून पुणे विद्यापीठ समर्थ भारत अभियान अंतर्गत या **कन्यारत्न अभियानांतर्गत 'लेक वाचवा जनजागृती'** करीता भव्य रॅलीचे आयोजन ***<u>शनिवार, दिनांक २५ ऑगस्ट २०१२ रोजी पुणे विद्यापीठ, मुख्य इमारत ते शिवाजीनगर अभियांत्रिकी महाविद्यालय मैदान</u>*** याप्रमाणे करण्यात येत आहे. या रॅलीमध्ये पुणे विद्यापीठातील महाविद्यालयांमधून प्रत्येकी ५० याप्रमाणे २००० विद्यार्थी व विद्यार्थीनी सहभागी होणार आहेत. ***<u>तरी सदर रॅलीकरीता आपल्या महाविद्यालयातील ५० विद्यार्थी/विद्यार्थीनीं यांना रॅलीमध्ये सहभागी होण्याकरीता दि. २५ ऑगस्ट २०१२ रोजी सकाळी ८.०० वाजता पुणे विद्यापीठ मुख्य इमारत याठिकाणी पाठवावे ही विनंती.</u>***

**कळावे.**

आपले विश्वासू

२२/८/१२

**सचिव,**
**समर्थ भारत अभियान**

**प्रमुख समन्वयक**
**समर्थ भारत अभियान**